आम्ही अखेरचे भेटलो खरेखुरे
तेव्हा मी स्वतःच ओशाळलेला...
नीट बोलता येत नव्हते की वागताही
स्वतःच्या कोषातच अडकलेला होतो.

विचार गुरफटलेले आत आपल्यातच,
भावनाही गर्भगळीत आणि उदासवाण्या
कशी ही परिस्थिती अधांतरी मनाची?
अशी ठरावी हीच भेट आमची अखेरची?

ती तशीच बसलेली प्रौढ शांततेने
माझी तगमग स्वतःच झाकून टाकत
अडलेले पाऊल माझे सुटेल म्हणून
थबकून थोडे, उरलेले अंतर सांभाळत !

तिने आपल्या शांततेची पराकाष्ठा केली,
मूक मनाने, आसमंतात नसलेले नकार
आपल्या उंबऱ्याशी ठेवून, सोसत बसलेली !
कल्पना नव्हती, हाताशी असलेले नसण्याची !

पुढे आयुष्यात दोन-चारदा भेट झाली
मोघम, अनोळख्याशी व्हावी ओळख तशी !
तिचे शांतपण टिकून होते कायमच
आणि माझा ओशाळेपणाही असाच !

आता तर भेटही नाही, शक्यताही नाही
काय वाटते आहे तिला हेही कळण्याची
खंत जोपासतोय, कळणार तिला हेही नाही.
आयुष्यभर ओशाळलेला मी, तगमग माझी

२२.१.२०१९